**ठळक बातम्या**

- वक्फ सुधारणा विधेयकावर राज्यसभेत चर्चा सुरु/ वक्फ मालमत्तांचं व्यवस्थापन करणं हा विधेयकाचा हेतू असल्याचं सरकारतर्फे स्पष्टिकरण, तर हेतूबद्दल विरोधकांचे विविध आरोप

- राज्यात येत्या १ मे पासून ‘फेसलेस नोंदणी’, ‘मुद्रांक नोंदणी’ आणि ‘वन स्टेट, वन रजिस्ट्रेशन’ प्रणाली लागू होणार

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची थायलंडच्या प्रधानमंत्र्यांशी द्विपक्षीय चर्चा, दोन्ही देशांमधे विविध क्षेत्रांमधल्या सहकार्यासाठी सहा सामंजस्य करार

**आणि**

- राज्याच्या विविध भागात अवकाळी पावसाची हजेरी, येत्या दोन दिवसात चारही विभागांमधे तुरळक ठिकाणी वादळी वाऱ्यासह पावसाची शक्यता

**<><><><><>**

वक्फ सुधारणा विधेयकावर राज्यसभेत चर्चा सुरू आहे. संयुक्त संसदीय समितीत सखोल चर्चा केल्यानंतरच हे विधेयक आणल्याचं अल्पसंख्यक कार्य मंत्री किरेन रिजिजू यांनी विधेयक मांडताना सांगितलं. वक्फच्या मालमत्तेत मुस्लिमेतर व्यक्ती हस्तक्षेप करणार नाही, याचा लाभ केवळ मुस्लिम व्यक्तींनाच मिळेल, असं रिजीजू यांनी स्पष्ट केलं. या विधेयकाचा हेतू वक्फ मालमत्तांचं व्यवस्थापन करणं असून मुस्लिमांच्या धार्माचरणात हस्तक्षेप करण्याचा नाही असंही त्यांनी सांगितलं.

वक्फ सुधारणा विधेयक आणून सरकार समाजात विभाजन करण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप काँग्रेस खासदार सय्यद नासेर हुसैन यांनी केला. हे विधेयक चुकीच्या माहितीच्या आधारे बनवलं गेल्याचं हुसैन म्हणाले. संयुक्त संसदीय समितीत बहुसंख्य सदस्यांनी विधेयकाला विरोध केला होता. त्यामुळे

वक्फशी संबंध नसणाऱ्या लोकांना समितीत चर्चेसाठी बोलावलं गेलं असा आरोपही त्यांनी सरकारवर केला.

हे विधेयक पसमांदा मुसलमान, महिला, गरीब यांच्या आयुष्यात क्रांतीकारी परिवर्तन आणणारं आहे, असं भाजपा खासदार राधामोहन दास अग्रवाल म्हणाले. विकसित भारताचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी मुस्लिमांचा विकासही महत्वाचा आहे, या विधेयकामुळे हे साध्य होईल, असं अग्रवाल म्हणाले.

या विधेयकाद्वारे एका विशिष्ट समुदायाला लक्ष्य केलं जात असल्याचा आरोप द्रमुकचे खासदार तिरुजी शिवा यांनी केला. हे विधेयक धर्मनिरपेक्षतेच्या तत्वाविरोधात आहे असं म्हणत शिवा यांनी विधेयकाला विरोध केला.

हे विधेयक जनतेच्या मूलभूत अधिकाराविरोधात आहे असं तृणमूल काँग्रेसचे खासदार मोहम्मद नदीमुल हक म्हणाले. आम आदमी पार्टीचे खासदार संजय सिंह यांनी हे विधेयक संविधानविरोधी असल्याचं सांगत ते मागे घेण्याचं सरकारला आवाहन केलं. राष्ट्रीय जनता दलाचे खासदार मनोज कुमार झा यांनीही विधेयकाच्या हेतूवर शंका उपस्थित केली.

**<><><><><>**

राज्यात येत्या १ मे पासून ‘फेसलेस नोंदणी’, ‘मुद्रांक नोंदणी’ आणि ‘वन स्टेट, वन रजिस्ट्रेशन’ प्रणाली लागू होणार असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. ते आज मुंबईत प्रसारमाध्यमांशी बोलत होते. एखादी व्यक्ती नागपूरमध्ये घर घेत असल्यास पुण्याहूनही त्याची नोंदणी करता येईल. यासाटी आयकर प्रमाणपत्र आणि आधारकार्डाचा आधार घेतला जाईल. असंही ते म्हणाले. यामुळे भ्रष्टाचार कमी होईल, नागरिकांचा वेळ वाचेल आणि डिजिटल प्रक्रियेमुळे महसूल व्यवहार अधिक पारदर्शक होतील. असंही त्यांनी सागितलं.

**<><><><><>**

भारत आणि थायलंड यांनी आज आयटी, सागरी क्षेत्र, लघु आणि मध्यम उद्योग, हातमाग आदी क्षेत्रात सहकार्य करण्याच्या दृष्टीने सहा सामंजस्य करार केले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि थायलंडचे प्रधानमंत्री पेईतोंगटार्न शिनावात्रा यांच्यात झालेल्या द्विपक्षीय चर्चेनंतर हे करार झाले. दोन्ही देशातली धोरणात्मक भागीदारी बळकट करण्याचा निर्णय या चर्चेत झाल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी संयुक्त निवेदनात म्हटलं आहे. दोन्ही देशांच्या सुरक्षा यंत्रणांमधे धोरणात्मक संवाद वाढवणं, पर्यटन, संस्कृती आणि शिक्षण क्षेत्रात सहकार्य वाढवण्याबाबत सकारात्मक चर्चा झाल्याचं मोदी यांनी सांगितलं. व्यापार , गुंतवणूक वाढवण्याबाबतही दोन्ही देशात सहमती झाली. बौद्ध धर्म हा दोन्ही देशातला महत्वाचा दुआ असल्याचं प्रधानमंत्री म्हणाले. या भेटीत शिनावात्रा यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना त्रिपिटीकाची पाली भाषेतली प्रत भेट दिली. याबद्दल मोदी यांनी शिनावात्रा यांचे आभार मानले.

त्याआधी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज सहाव्या बिमस्टेक शिखर परिषदेत सहभागी होण्यासाठी थायलंडमधल्या बँकॉक इथे पोहोचले. विमानतळावर थायलंडचे उपप्रधानमंत्री सूर्या जुआनग्रुआंकित यांनी मोदी यांचं स्वागत केलं. थायलंडमधला भारतीय समुदायही प्रधानमंत्र्यांच्या स्वागतासाठी मोठ्या संख्येनं आला होता. त्यानंतर मोदी यांच्या स्वागतासाठी भरतनाट्यम आणि थायलंडच्या शास्त्रीय नृत्यशैलीचा मिलाफ दाखवणारा कार्यक्रम सादर करण्यात आला.
सहाव्या बिमस्टेक शिखर परिषदेसाठी प्रधानमंत्री उद्या उपस्थित राहणार आहेत. या शिखर परिषदेत अनेक करार आणि घोषणा होण्याची शक्यता आहे. ही परिषद आटोपून मोदी उद्या तीन दिवसांच्या श्रीलंकेच्या दौऱ्यावर जाणार आहेत.

**<><><><><>**

राज्यातले साखर कारखाने, ऊस वाहतूकदार, ऊसतोडणी मुकादम, मजूर यांच्यात अग्रिम रकमेवरून होणारी कोट्यवधींची फसवणूक टळावी, तसंच, ऊस

उत्पादक शेतकऱ्यांचं आर्थिक नुकसान होऊ नये, मजुरांच्या हक्कांचं संरक्षण व्हावं यासाठी ऊसतोडणी मुकादम आणि मजुरांचं संनियंत्रण करणाऱ्या सर्वसमावेशक कायद्याचा मसुदा तयार करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. मुंबईत सह्याद्री अतिथीगृहात आयोजित बैठकीत ते बोलत होते. प्रस्तावित कायद्याचा मसूदा कामगार आणि सामाजिक न्याय विभागाने संबंधित विभाग आणि घटकांसोबत चर्चा करून मंत्रिमंडळ बैठकीत विचारासाठी ठेवावा अशा सूचनाही पवार यांनी यावेळी दिल्या.

**<><><><><>**

राज्याच्या अनेक भागात आज अवकाळी पाऊस झाला.

**रत्नागिरीत** आज पहाटे अनेक ठिकाणी वीजांसह जोरदार पाऊस पडला. पावसामुळे आंबा-काजूसारख्या पिकांसाठी तो नुकसान झालं आहे.

**भंडारा** जिल्ह्यात आज सकाळपासून वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस होत आहे. तुमसर तालुक्यातल्या पाथरी इथं वीज पडून दोन मजुरांचा मृत्यू झाला.

**नागपूर** जिल्ह्यात आज सकाळपासून वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाने हजेरी लावली आहे. पावसामुळे शहरात अनेक ठिकाणी झाडांची पडझड झाली आहे.

**अहिल्या नगर** जिल्ह्यात बहुतांश भागात जोरदार पाऊस झाला. अवकाळी पावसाने कांदा आणि फळबागांचे नुकसान झाले.

**लातूर** शहर आणि परिसरात संध्याकाळी मेघगर्जनेसह जोरदार पाऊस झाला. वादळी वाऱ्यामुळे लातूरमध्ये अनेक भागातला विद्युत पुरवठा खंडीत झाला होता.

**साताऱ्याच्या** काही भागात आज दुपारी मेघगर्जनेसह अवकाळी पावसानं हजेरी लावली.

**बीड** जिल्ह्यात केज तालुक्यात केकाणवाडी इथं झाडावर वीज कोसळल्यामुळे शेतकरी आणि गायीचा मृत्यू झाला.

**<><><><><>**

भारतीय लोकशाहीचं सर्वसमावेशक स्वरूप दर्शवणारं राज्यसभा हे संसदेचं स्थायी सभागृह असल्याचं उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांनी म्हटलं आहे. आज राज्यसभा दिनानिमित्त ते सभागृहात बोलत होते…

**होल्ड - बाईट- धनखड……**

१९५२ मधे ३ एप्रिल रोजी राज्यसभा अस्तित्वात आली.

**<><><><><>**

भारताबद्दल फार पूर्वीपासून आपल्याला कुतूहल होतंच, पण आता प्रत्यक्ष भारतभेटीमुळे आपण अचंबित झालो आहोत, अशी भावना चिलीचे अध्यक्ष ग्रॅबियल बोरिक फॉन्ट यांनी आज व्यक्त केली. ते आज मुंबईत राजभवन इथे आले होते. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी त्यांचं स्वागत केलं. नवी दिल्ली इथे भारत आणि चिलीमध्ये ‘सामायिक आर्थिक भागीदारी करार’ झाला असून व्यापार आणि वाणिज्य याशिवाय आपला देश भारताशी कृषी उद्योग, संस्कृती, महत्वपूर्ण खनिज आणि विशेष करून चित्रपट निर्मितीमध्ये सहकार्य करण्यास उत्सुक असल्याचं ते यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

५७व्या राष्ट्रीय खो-खो अजिंक्यपद स्पर्धेत महाराष्ट्राचे पुरुष आणि महिला संघ उपांत्य फेरीत पोहोचले आहेत. ओदिशात पुरी इथं आयोजित या स्पर्धेत महाराष्ट्राच्या पुरुष संघाने उपान्त्यपूर्व फेरीत पश्चिम बंगालचा पराभव केला तर महिला संघाने कोल्हापूर संघाचा पराभव केला. उपान्त्य फेरीत पुरुष संघाचा सामना ओडिशाविरुद्ध होणार आहे तर महिला संघाची गाठ दिल्ली संघाबरोबर पडेल.

**<><><><><>**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने वक्फ दुरुस्ती विधेयकाला विरोध करून हिंदुत्वाला आणि बाळासाहेब ठाकरेंच्या विचारांना कायमचं सोडल्याची टीका शिवसेना नेते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली आहे. ते मुंबईत बातमीदारांशी बोलत होते. उद्धव ठाकरे यांचा वैचारिक गोंधळ उडाला असून त्यांचं राजकीय भविष्य अंधारात असल्याचंही शिंदे यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज कोलकाता नाईट रायडर्स, आणि सनरायजर्स हैदराबाद यांच्यात सामना होणार आहे. कोलकात्याच्या इडन गार्डन्स स्टेडियमवर थोड्याच वेळात, म्हणजे साडेसात वाजता हा सामना सुरू होईल.

सनरायजर्स हैदराबादनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

धुळे जिल्ह्याच्या शिरपूर तालुक्यातील दहिवद शिवारात आज नशा करण्यासाठी वापरलं जाणारं स्पिरिट जप्त करण्यात आलं. राज्य उत्पादन शुल्क विभागानं यावेळी तिघांना ताब्यात घेतलं असून या कारवाईत अधिकाऱ्यांनी दोन बोलेरो गाड्यांसह २ हजार लिटर स्पिरीट जप्त केलं.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात विदर्भात काही ठिकाणी, तर कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. कोकणात काही ठिकाणी कमाल तापमानात किंचित वाढ झाली, तर मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात तुरळक

ठिकाणी लक्षणीय घट झाली. मराठवाड्यातही तुरळक ठिकाणी कमाल तापमानात किंचित घट झाली.

राज्यात सर्वात जास्त कमाल तापमान ब्रम्हपुरी इथं ३८ पूर्णांक ८ दशांश अंश सेल्सिअस इतकं नोंदवलं गेलं.

येत्या दोन दिवसात विदर्भात काही ठिकाणी, तर कोकण, मध्य महाराष्ट्र, आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी, सोसाट्याचा वारा विजांचा कडकडाट आणि मेघगर्जनेसह पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे.

//<><><><><>//